२९.१०.२०१८

ॐ

श्री. समर्थ शारदा सुगम संगीत संस्था, कल्याण

प्रति,

सर्व संचालक,

विषय :- इयत्ता १०वी चे विद्यार्थ्यांना वाढीव गुणांसाठी आपल्या संस्थेच्या प्रमाणपत्रांना गतवर्षी शासनाने दिलेली मान्यता : नुतनीकरणाविषयी.

महोदय,

कळविण्यात येत आहे की संस्थेच्या सर्वसाधारण सभा दि. २० जुलै २०१८ मध्ये उपरोक्त विषयी नुतनीकरणाचा अर्ज या वर्षी **पुन्हा न करण्याचे** ठरविण्यात आले आहे.

या संबंधात आपणा सर्वांना वेळोवेळी पूर्वसूचना देण्यात आलेल्या आहेतच. तसेच मेळाव्यामध्येही याची कल्पना दिलेली आहे. संबंधित विद्यार्थी /पालकांना अवगत करणे विषयीही कळवलेले होते. त्याची पूर्तता आपण यापूर्वी केली असेलच.

यापूर्वीच्या परिपत्रकातील संबंधित सूचनेचा भाग या परिपत्रकासोबतही संदर्भासाठी देत आहे.

सर्व संचालक व परिक्षकांसाठी

❖ एस.एस.सी. च्या पुढील परिक्षासत्रापासून वाढीव गुणांसाठी संस्थेने अर्ज करावयाचा नाही असे ठरविले आहे. सर्व संचालकांनी त्यांच्या क्लासमध्ये प्रवेश देताना व अगोदर दिलेल्यांना याची स्पष्ट कल्पना द्यावी. कोणत्याही पालकांनी संस्थेच्या पदाधिका-यांकडे चौकशी करावयाची नाही. संबंधित विद्यार्थ्यांच्या शिक्षकांनीच पालकांना या गोष्टी स्पष्ट कळवायच्या आहेत. ही जबाबदारी संचालकांचीच राहील. संस्थेचा हा निर्णय असल्यामुळे त्याबद्दल स्पष्टीकरण आवश्यक नाही. कृपया याची नोंद घ्यावी. व त्याप्रमाणे वर्गातील विद्यार्थी व पालक यांना स्पष्ट कल्पना द्यावी.

आपली,

अध्यक्षा,

सौ. सुनीता रानडे.